दिव्य मराठी धुळे सिटी 25-05-2025

# एसव्हीकेएम फार्मसीच्या १३ विद्यार्थ्यांची निवड



फार्मसी कंपनीत निवड झालेले एसव्हीकेएम फार्मसीचे विद्यार्थी.

येथील एसव्हीकेएम फार्मसी महाविद्यालयातील १३ विद्यार्थ्यांची मॅकलॉड्स फार्मास्युटिकल्स लिमिटेड कंपनीत निवड झाली.

लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखती आणि वैयक्तिक संवादातून विद्यार्थ्यांची निवड झाली. महाविद्यालयातील बी. फार्मसी अभ्यासक्रमाचे ललित सुनील पाटील, हितेश गुरुदत्त पाटील, गौरव भालचंद्र मालपुरे, हिताक्षी किशोर पाटील, करिश्मा शालिक पाटील, ग्रीष्मा काळू भामरे, तनिशा घनश्याम शर्मा, जागृती सुरेश नेरकर, मानसी विक्रम जैन व एम. फार्मसी अभ्यासक्रमाच्या पंकज आनंद पाटील, लोकेश परेश भाटे, सुमीत बापूराव सोनवणे, सौरव वसंत पाठक यांची निवड झाली. विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल प्राचार्य डॉ. समीर गोयल, प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. करण शर्मा, संस्थेचे अध्यक्ष, आमदार अमरीश पटेल, सहअध्यक्ष भूपेश पटेल, उपाध्यक्ष चिंतन पटेल, एसव्हीकेएम, एनएमआयएमएस ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या प्रेसिडेंट व चॅन्सलर स्नेहा अंकित पारिख यांनी समाधान व्यक्त केले आहे.

लोकमत



विद्यार्थ्यांसह प्राचार्य डॉ. समीर गोयल व प्राध्यापक.

# एस.व्ही.के.एम. फार्मसी कॉलेजचा शंभर टक्के प्लेसमेंटचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** येथील एस.व्ही.के.एम. फार्मसी कॉलेजने २०२४-२५ शैक्षणिक वर्षात एम. फार्मसीच्या १००% विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंट करून नवा विक्रम रचला आहे. औषधनिर्माण शिक्षण क्षेत्रातील या अग्रगण्य संस्थेने फार्माकोलॉजी, फार्मास्युटिक्स, फार्मास्युटिकल केमिस्ट्री आणि फार्मास्युटिकल क्वालिटी ॲश्युरन्स या सर्व शाखांमधील विद्यार्थ्यांना यशस्वीरीत्या नोकऱ्या मिळवून दिल्या आहेत. प्राचार्य डॉ. समीर गोयल यांनी या यशाचे श्रेय दीर्घकालीन नियोजन, आधुनिक प्रशिक्षण आणि उद्योगांशी असलेल्या मजबूत संबंधांना दिले. 'इंडस्ट्री-अकॅडेमिया कोलॅबोरेशन' अंतर्गत विद्यार्थ्यांना थेट औद्योगिक प्रकल्पांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांना उद्योगाच्या गरजांनुसार तयार केले जाते.

ट्रेनिंग व प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. करण शर्मा, डॉ. भूषण द्रवंकर, प्रा. सुमित राठोड, डॉ. मृगेंद्र पोतदार, प्रा. जुगल मंदन, प्रा. श्रद्धा सुखदेवे, प्रा. गौरव पाटील आणि सर्व प्राध्यापकांचे मोलाचे योगदान लाभले. एस.व्ही.के.एम. संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, एस.व्ही.के.एम. एन.एम.आय.एम.एस. ग्लोबल युनिव्हर्सिटी प्रेसिडेंट स्नेहा अंकित पारिख, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, डॉ. अजय पसारी, प्राचार्य डॉ. समीर गोयल यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. (वा.प्र.)

पुण्य नगरी

# धुळे एसव्हीकेएम इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीत धनश्री कापडणीस प्रथम



**धुळे** : श्री विलेपार्ले केळवणी मंडळ, मुंबई संचलित धुळे येथील एस.व्ही.के.एम. इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष बी.फार्मसी विभागातील विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी अंतर्गत घेण्यात आलेल्या सत्र परीक्षा २०२५ मध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. धनश्री दिलीप कापडणीस हिने ९.१९ सीजीपीए मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. प्रेरणा संभाजी हिने ८.८५ सीजीपीए द्वितीय, वैष्णवी संजय नांदोडे ८.८१ सीजीपीए व भाग्यश्री संदीप पाटील ८.८१ सीजीपीए संयुक्तरीत्या तृतीय क्रमांक, सुशांत राजेश शहा ८.७६ सीजीपीए चतुर्थ क्रमांक, संदेश सुभाष पाटील ८.७४ सीजीपीए पाचवा क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाले. या यशाबाबत प्राचार्य डॉ.समीर गोयल म्हणाले, विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन, आधुनिक प्रयोगशाळा, तसेच संशोधन केंद्रित शिक्षण पद्धतीमुळे आमचे विद्यार्थी आज राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करू शकतात. या यशाबद्दल एस.व्ही.के.एम. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, एस.व्ही.के.एम. एन.एम.आय.एम.एस. ग्लोबल युनिव्हर्सिटी प्रेसिडेंट व चान्सलर स्नेहा पारिख, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, मार्गदर्शक डॉ. अजय पसारी, प्राचार्य डॉ. समीर गोयल यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक केले.

लोकमत

# एचपीव्ही लसीकरणावर व्याख्यानातून जागृती

## महिलांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे पाऊल

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** धुळे येथील एस. व्ही. के. एम. एन. एम. आय. एम. एस. ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी अँड टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट (एसपीटीएम)ने महिलांच्या आरोग्याविषयी एक महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवला. समाजाच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या एचपीव्ही लसीकरणाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांनी 'डिस्कशन ऑन द एचपीव्ही वॅक्सिन्स' या विषयावर एक विशेष व्याख्यान आयोजित केले होते.

सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया प्रा. लि. यांच्या सहकार्याने आणि वुमन्स फोरमच्या माध्यमातून हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला, ज्याचा उद्देश विद्यार्थी आणि समाजात मानवी पॅपिलोमा व्हायरस व त्याच्या प्रतिबंधाबद्दल माहिती पोहोचवणे, हा होता. 'महिला सक्षमीकरणासाठी ज्ञान हेच खरे शस्त्र आहे,' या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डीन डॉ. समीर गोयल आणि विजय पाटील यांचे विशेष योगदान राहिले.

## एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व केले विषद...

१ स्त्रीरोग तज्ज्ञ, लॅप्रोस्कोपिक सर्जन आणि ऑब्स्टेट्रिक्स विशेषज्ञ डॉ. आराधना राहुल भामरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी एचपीव्ही लस ही महिलांच्या प्रजनन आरोग्यासाठी क्रांतिकारी ठरलेली आहे, असे सांगितले.

२ गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण कमी करण्यासाठी ही लस अत्यंत उपयुक्त आहे. डॉ. भामरे यांनी लसीकरणाची योग्य वेळ, डोस, संभाव्य दुष्परिणाम आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशींबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी महिलांच्या आरोग्याविषयी असलेल्या गैरसमजुती दूर करण्यावरही भर दिला, ज्यामुळे हे सत्र अधिक माहितीपूर्ण ठरले.

३ सत्रानंतर झालेल्या चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांमुळे एचपीव्ही लसीकरणाबाबतच्या त्यांच्या शंका दूर झाल्या. डीन डॉ. गोयल यांनी भविष्यातही असे उपक्रम राबवत राहण्याची ग्वाही दिली. डॉ. आरती बेलगमवार आणि प्रा. मृणाली पाटील यांनी समन्वयक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.या व्याख्यानाला विद्यार्थी, संशोधकांचा प्रतिसाद मिळाला

दैनिक सातपुडा वार्ता

# धुळे एस.व्ही.के.एम. च्या दीक्षारंभ कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक दिशा



धुळे

एस.व्ही.के.एम. च्या फार्मसी कॉलेजमध्ये आयोजित ₹दीक्षारंभ – द बिगिनिंग₹ या इंडक्शन कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक वाटचालीची स्पष्ट दिशा मिळाली, तसेच मानवी मूल्ये, सामाजिक जाणीव आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी तो एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.राजेंद्र वनाळे यांनी महाविद्यालय आणि अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती दिली. प्रा. श्रद्धा सुखदेवे यांनी सॉफ्ट स्किल्स आणि संवाद कौशल्यावर बहुमोल मार्गदर्शन केले. कॅम्पस टूरमध्ये विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळा, विभाग, वाचनालय आणि इतर सुविधांची माहिती घेतली. किरण उप्पल आणि मंगेश पारकर यांनी हॉस्टेलमधील शिस्त, सुविधा आणि सामाजिक जीवनावर प्रकाश टाकला.

डॉ. भूषण द्रव्यकर, प्रा. महेंद्र खैरनार आणि डॉ. मुजम्मिल हुसेन यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची माहिती देत सहभागाच्या संधी सांगितल्या. मेडिसिनल गार्डन व्हिजिटमध्ये विद्यार्थ्यांनी औषधी वनस्पतींचा अभ्यास केला, ज्यामध्ये डॉ. राजू वाडेकर, डॉ. प्रदीप बावणे आणि प्रा. रेवती देवरे यांनी मार्गदर्शन केले.

दुपारनंतर विद्यार्थ्यांनी खान्देश कॅन्सर हॉस्पिटलला भेट देऊन औषधनिर्माणाचा व्यावहारिक उपयोग अनुभवला. शेवटच्या दिवशी मेडिसिनल शॉपला भेट देत औषध विक्रीची प्रक्रिया समजून घेतली. प्रा. मृणाली पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या.



डीन डॉ. समीर गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अब्दुल्ला शेरिकर, प्रा. श्रद्धा सुखदेवे, प्रा. रेवती देवरे आणि इतर शिक्षकांच्या अथक प्रयत्नांमुळे हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी एक संस्मरणीय अनुभव ठरला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. श्रद्धा सुखदेवे यांनी केले, तर आभार डॉ. अब्दुल्ला शेरिकर यांनी मानले.